राज्याचे युवा धोरण-२०१२
युवा महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः युकयो- २०१२/प्र.क्र.६७/क्रीयुसे-३

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई.
तारीख: ०६ जानेवारी, २०१४

वाचा :-

**१) शासन निर्णय क्रमांकः युकयो-२०११/प्र.क्र.४३/क्रीयुसे-३ दिनांक १४ जून,२०१२**

**प्रस्तावना :-**

देशाचे युवा धोरण २००३ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील १३ ते ३५ वयोगटातील युवा लोक संख्येचा विचार करता देशाच्या युवा धोरणाच्या अनुषंगाने राज्याचे स्वतंत्र युवा धोरण तयार करुन त्याद्वारे युवक कल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी राज्याचे युवा धोरण २०१२ वरील शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आले आहे. राष्ट्रीय एकात्मता तसेच युवांच्या सुप्त गुणाना वाव देण्यासाठी केंद्र शासनामार्फत १९९४ पासून राष्ट्रीय युवा महोत्सवाचे राज्यामध्ये आयोजन करण्यात येते. यामध्ये प्रत्येक राज्याचे प्रतिनिधी संघ सहभागी होतात. राज्याची संस्कृती व परंपरा जतन करण्यासाठी जिल्हा/राज्य/राष्ट्रीय स्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. राज्यामध्ये युवा महोत्सवाचे आयोजन प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हा,विभाग व राज्यस्तरावर महोत्सवांचे आयोजन करुन राज्याचा प्रतिनिधी संघ राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड करण्यासाठी स्तरनिहाय अनुदान देऊन राज्यातील युवांना युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदरची योजना कार्यान्वित आहे. युवा धोरण २०१२ चा मसुदा तयार करणाऱ्या समितीने सध्या कार्यरत असणाऱ्या या योजनेतील अल्प अनुदान वाढवून ते भरीव स्वरुपात देण्याची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने या योजनेत भरीव तरतूद व सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या **१७ जुलै, १९९४** च्या मार्गदर्शक सुचनानुसार सदरची योजना सुरू आहे. ती या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करण्यात येत आहे. तसेच युवा महोत्सव या योजनेमध्ये भरीव आर्थिक तरतूद देऊन ही योजना पुढीलप्रमाणे सुधारित स्वरूपात राबविण्यासाठी राज्य शासन मान्यता देत आहे. सदरची योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार १३ ते ३५ वयोगटातील युवक व युवतीसाठी दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल. राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन प्रतिवर्षी १२ जानेवारी रोजी करण्यात येत असल्याने राज्यामध्ये प्रतिवर्षी डिसेंबर मध्ये राज्य महोत्सव,तर नोव्हेंबर मध्ये विभाग व जिल्हा महोत्सव आयोजित करण्यात यावेत. राज्य व जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी खालील प्रमाणे आयोजन समिती राहील.

**अ) राज्यस्तर आयोजन समिती:-**

| | |
|---|---|
| आयुक्त, क्रीडा व युवक सेवा | - अध्यक्ष |
| व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | - सदस्य |
| संचालक, सांस्कृतिक कार्य | - सदस्य |
| विभागीय माहिती अधिकारी (संबंधित विभागातील) | - सदस्य |
| नेहरु युवा राज्य समन्वयक | - सदस्य |
| राष्ट्रीय युवा पुरस्कार/राज्य युवा पुरस्कारार्थी (दोन) | - सदस्य |
| संबधित विभागाचे उपसंचालक क्रीडा व युवक सेवा | - सदस्य सचिव |

**ब) विभाग व जिल्हास्तर समिती:-**

| | |
|---|---|
| उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संबंधित विभाग) | - अध्यक्ष |
| नेहरु युवा समन्वयक | - सदस्य |
| जिल्हा माहिती अधिकारी | - सदस्य |
| नॅशनल सर्व्हिस स्किम प्रमुख संबंधित विदयापीठ | - सदस्य |
| संगीत तज्ञ/विशारद/परिक्षक दोन प्रतिनिधी | - सदस्य |
| जिल्हा क्रीडा अधिकारी | - सदस्य सचिव |

- **समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या -:**
- युवा महोत्सवाच्या आयोजनाची तयारी करणे
- युवा महोत्सवाचे ठिकाण निश्चित करणे
- परिक्षक यांची नियुक्ती करणे
- युवा महोत्सवाचे दरम्यान तक्रार उदभवल्यास त्याचे निवारण करणे.

<u>**युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी पात्रतेचे निकष -:**</u>

- सहभागी युवा १३ ते ३५ वयोगटातील असावा.(युवा वयोगटाची व्याख्या केंद्र शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या निकषाप्रमाणे राहील.)
- ज्या बाबींना साथसंगत आवश्यक आहे त्या कलाकारांना वयोमर्यादा लागू नाही.
- एकांकिकेमध्ये सहभागी होणारे सर्व युवा कलाकार तसेच एकांकिंका लेखक,निर्माता, दिग्दर्शकसुध्दा १३ ते ३५ वयोगटातील असावेत.
- सहभागी होणारा युवा हा महाराष्ट्रातील/जिल्हातील रहिवासी असावा.

- ओडिसी, भरतनाटयम, मणीपुरी, कथ्थक, कुचीपुडी नृत्य सादर करणा-या कलाकारांना पुर्वमुद्रीत ध्वनीफितीवर (कॅसेट,सीडी) कार्यक्रम सादर करता येईल.
- लोकगीत व लोकनृत्य या प्रकारातील गीते शक्यतो चित्रपट बाहय असावीत.
- सहभागी कलाकारांनी आवश्यक असणारे साहित्य स्वता:च्या जबाबदारीवर आणावे उदा.मेकअप कीट इत्यादी.
- अस्पर्धात्मक बाबींच्या निवडीचे अधिकार मा. आयुक्त/संचालक,क्रीडा व युवक सेवा पुणे यांना राहतील.
- संयोजकामार्फत फक्त स्टेज, विदयुत व्यवस्था पुर्व कल्पना दिल्यानंतरच उपलब्ध करुन देण्यात येईल.
- राज्य, विभाग, जिल्हा स्तरावरील युवा महोत्सवाचे आयोजन प्राधान्याने पर्यटक आत्कृष्ट होतील अशा ठिकाणी करावे. आयोजनासाठी जागा पर्यटन विकास महामंडळाने विनामुल्य उपलब्ध करुन दयाव्यात.
- युवा महोत्सवाच्या दरम्याने येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर त्रिसदस्यीय तक्रार समिती नियुक्त करण्यात येईल आणि समितीचा निर्णय अंतिम राहील.
- राज्य व विभागस्तर तक्रार निवारण समिती-
  - i. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा-(संबंधित विभागाचे)
  - ii. राष्ट्रीय/राज्य युवा पुरस्कारार्थी
  - iii. संबंधित कलाक्षेत्रातील तज्ञ .
- जिल्हास्तर तक्रार निवारण समिती
  - i . जिल्हा क्रीडा अधिकारी
  - ii . राष्ट्रीय/राज्य युवा पुरस्कारार्थी
  - iii . संबंधित कलाक्षेत्रातील तज्ञ.

<u>महोत्सवातील कार्यक्रमाची रुपरेषा</u> :-

युवा महोत्सवामध्ये स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक अशा दोन प्रकारामध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

**स्पर्धात्मक:-**

| अ.क्र. | बाब | सहभाग संख्या | वेळ |
|---|---|---|---|
| १ | लोकनृत्य | २० | १५ मिनिट |
| २ | लोकगीत | ०६ | ७ मिनिट |
| ३ | एकांकिका (इंग्रजी/हिंदी) | १२ | ४५ मिनिट |
| ४ | शास्त्रीय गायन (हिंन्दुस्तीनी) | १ | १५ मिनिट |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | शास्त्रीय नृत्य | १ | १५ मिनिट |
| ६ | सितार | १ | १५ मिनिट |
| ७ | बासरी | १ | १५ मिनिट |
| ८ | तबला | १ | १० मिनिट |
| ९ | वीणा | १ | १५ मिनिट |
| १० | मृदंग | १ | १० मिनिट |
| ११ | हार्मोनियम(लाईट) | १ | १० मिनिट |
| १२ | गिटार | १ | १० मिनिट |
| १३ | मणिपूरी नृत्य | १ | १५ मिनिट |
| १४ | ओडिसी नृत्य | १ | १५ मिनिट |
| १५ | भरतनाटयम् | १ | १५ मिनिट |
| १६ | कथ्थक | १ | १५ मिनिट |
| १७ | कुचिपूडी नृत्य | १ | १५ मिनिट |
| १८ | वक्तृत्व | १ | ४ मिनिट |

**<u>अस्पर्धात्मक:-</u>**

- राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे कार्यक्रम जिल्हा ,विभाग व राज्यस्तरावर आयोजित करता येतील. मात्र राष्ट्रीय युवा महोत्सवातील बाबींसाठी राज्याचा प्रतिनिधीक संघ पाठविण्यात येईल.
- अस्पर्धात्मक दोन कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर पाठविण्यात येतील .

**<u>युवा महोत्सवासाठी स्तरनिहाय अनुदान मर्यादा</u>**

| | | |
|---|---|---|
| जिल्हास्तर<br>(३५ जिल्हे) | प्रतिजिल्हा<br>रु-/७५,०००. | रु-/२६,२५,०००. |
| विभागस्तर<br>(८ विभाग) | प्रतिजिल्हा<br>रु-/१,२५,०००. | रु-/१०,००,०००. |
| राज्यस्तर आयोजन व राष्ट्रीय स्तरावर राज्याचा प्रतिनिधीक संघ पाठविण्याकरिता येणारा खर्च | -- | रु-/१३,७५,०००. |
| | एकूण | रु-/५०,००,०००. |

सदरचा खर्च मागणी क्र. ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा १०३ विद्यार्थीत्तर युवक कल्याण कार्यक्रम (१०) युवक कल्याण ग्रामीण भाग, (१२) युवा धोरणातंर्गत योजना, युवा महोत्सवाचे आयोजन

(२२०४ ५५८२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षामध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा .

अनुदान मंजूरीचे अधिकारी आयुक्त, संचालक क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील. नियमात अंशत: /पुर्णत: बदल करण्याचे अथवा नियम शिथील करण्याचे अधिकार शासनास राहतील.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र.अनौस ७०८व्यय- ५दि १४.१०.२०१३ .अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१०६१५१३५५०९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.01.06 15:17:24 +05'30'

**( रा. चं. पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव,(शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)
२. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य व पर्यटन, मुंबई
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, या शासन निर्णयाला कृपया यथोचित प्रसिध्दी दयावी. व आपले आधिनस्त सर्व विभागीय माहिती अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी यांना सदरचा शासन निर्णय अवगत करून द्यावा.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
५. झोनल डायरेक्टर,नेहरु युवा केंद्र,मुंबई.
६. संचालक, सांस्कृतिक कार्य, जुने सचिवाल, मुंबई
७. राज्य समन्वयक,नॅशनल सर्विस स्कीम पुणे.
८. संचालक, क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे.
९. सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
१०.सर्व जिल्हाक्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)

११.वित्त विभाग, कार्यासन व्यय-५, मंत्रालय, मुंबई
१२.नियोजन विभाग,कार्यासन १४७१, मंत्रालय, मुंबई
१३.सर्व विभागीय माहिती अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी (माहिती जनसंपर्क महासंचालनालयामार्फत)
१४.मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव
१५.मा. राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
१६.निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२, क्रीयुसे-३)